बँक ऑफ इंडिया Bank of India BOI Relationship beyond banking

# आंचलिक कार्यालय : रत्नागिरी विभाग
शिवाजीनगर, रत्नागिरी, ४१५६३९

## सरफेसी अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तांची ई-लिलावाद्वारे भव्य विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स अॅन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(२) च्या तरतुदीसह वाचण्यात आलेल्या नियमांतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषत: खालील कर्जदारांना/जामीनदारांना सूचना देण्यात येते कि, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ज्याचा भौतिक ताबा घेतलेला आहे अशा खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्त्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्त्वावर आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्त्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित मालमत्ता तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदार/जामीनदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम (ईएमडी) प्रत्येक सुरक्षित मालमत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

**ई-लिलावाची तारीख आणि वेळ : २६.०३.२०२४ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० (समाप्तीपूर्वी १० मिनिटे अगोदर बोलीच्या मुदतवाढीच्या अधीनस्थ)**

| अ. क्र. | कर्जदार/जामीनदार/ मालक/गहाणदार/वारसदार यांची नावे | प्लॉट क्र. | विक्री करण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशील | बँक थकित रकमेचा तपशील | साठा | किमान राखीव किंमत (रुपयामध्ये) | बयाणा रक्कम (रुपयामध्ये) | ई-लिलावाची वेळ व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बँक ऑफ इंडिया, खापोली शाखा, खापोली, ता.खापोली, जि.रत्नागिरी. संपर्क क्र.०२१९८-२८४३५, प्राधिकृत अधिकारी: श्री.अनंत दिघे, मुख्य प्रबंधक, खापोली शाखा, मो.९८१०४९२६२० | | | | | | | | |
| १ | श्री.पार्वेज मुस्तफीन खत्रे व श्रीमती आफिया पार्वेज खत्रे. | १ | कर्जदार-गहाणदार श्री.पार्वेज मुस्तफीन खत्रे यांच्या मालकीचे सदनिका क्र. एफ-१, अप्पर पहिला मजला, फातिमा अपार्टमेंट, सर्वे नं.४६९, हिस्सा नं.११८, कँप खापोली, ता.खापोली, जि.रत्नागिरी. क्षेत्र- ७१० चौ.फुट (सिटअप) | प्रासंगिक पक्षकारी- रुपये १७.९३ लाख अधिक एनपीए तारखेपासून म्हणजेच ३१.०३.२०१८ पासून आकारण्यात न आलेले व्याज आणि इतर लागू शुल्क. | चौरीक | १६.१८ | ०२.०० | दि. २६/०३/२०२४ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० |

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

१. ई-लिलाव 'जे आहे जेथे आहे' 'जे काही आहे ते आहे' आणि 'ज्या स्थितीत आहे तसे आहे' तत्त्वावर ऑनलाईन प्रक्रियेद्वारे होईल.

२. पुढील तपशील, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करून घेण्यासाठी कृपया भेट द्या a) http://bankofindia.co.in b) ई-लिलाव सेवा पुरवठा दाराच्या वेबसाईटचा पत्ता : https://mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp, बोलीदार हे https://www.ibapi.in येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मार्गसूची माहितीपूर्ण विडीओसह उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील औपचारिकता आगाऊ पूर्ण होणे आवश्यक आहे.

स्टेप-१ : बोलीदारांची नोंदणी - बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर (लिंक वर देण्यात आलेली आहे) नोंदणी करणे आवश्यक आहे.

स्टेप-२ : केवायसी पडताळणी - बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी ई-लिलाव सेवा पुरवठादार करतील..

स्टेप-३ : बीडर म्हणजे ईएमडी वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन- ऑनलाईन ने एनइएफटी /हस्तांतरण ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे.

स्टेप-४ : बोली प्रक्रिया आणि बोली निकाल : इच्छुक बोलीदार स्टेप १,२ व ३ पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या स्टेप १ ते ई-लिलाव तारखेपूर्वीच बोलीदारांनी पूर्ण करावेत..

३. अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती प्रमाणे स्थावर मालमत्तांवर कोणताही भारभार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांवरील भारभार, नामनिर्देशन आणि दावे / अधिकार, देणी / मालमत्तेचा होणारी बाधा याची स्वतंत्रपणे चौकशी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी त्यांनी करावी. ई- लिलावाची जाहिरात प्रसिद्ध होणे म्हणजे कोणतीही असलेली थकबाकीदार असणे किंवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजण्यात येवू नये. मालमत्तांची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या आणि अज्ञात असलेल्या सर्व बाबी आणि गोष्टींसह करण्यात येईल. विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तांच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर करण्यात आल्यानंतर कोणत्याही स्वरूपाच्या दाव्याचा विचार केला जाणार नाही.

४. बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या संबंधित पाहणी करून स्वत:ची खात्री करून घेणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करून पाहणी करता येईल. स्थावर मालमत्तांच्या पाहणीसाठी दिनांक : ११.०३.२०२४ आणि १८.०३.२०२४ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० वा. पर्यंत असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखाशी त्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे त्यानुसार संपर्क करून पूर्वपरवानगी घेण्यात यावी.

५. केवळ ऑनलाईन प्रक्रीयेद्वारेच बोली सादर करण्यात याव्यात.

६. बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.

७. सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असावी आणि बोलीदारांना आपली बोली रु. १०,०००/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.

८. यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ई.एम.डी.) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेचा (ई.एम.डी.) त्यांना परतावा करण्यात येईल.

९. बयाणा रकमेच्या (ई.एम.डी.) ठेवीवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीच्या रकमेच्या २५% रक्कम ज्यामध्ये भरणा करण्यात आलेल्या बयाणा रकमेचा समावेश असून तात्काळतोच त्याच दिवशी किंवा काही कारणासाठी कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी त्याचा भरणा करावा लागेल.

१०. कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्क अडचण / विजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी / बँक किंवा ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत. अशी प्रसंग शेऊ नयेत यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम असावे आणि योग्य अशा पॉवर बॅकअप त्यांच्याकडे असावा.

११. यशस्वी बोलीदारांच्याद्वारे निश्चित झालेल्या विक्री रकमेचा भरणा बँकेकडे करण्यापूर्वी यशस्वी बोलीदाराकडून आयकर कायदा १९६१ च्या कलम १९४-१ए च्या अंतर्गत आणि टी.डी.एस. चा भरणा बोली रकमेच्या उर्वरित ७५% टक्के रकमेचा भरणा करताना करणे गरजेचे आहे. यशस्वी खरेदीदाराला लागू असणारे मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, अन्य प्रासंगिक शुल्क, संवैधानिक शुल्क आणि असंवैधानिक शुल्क किंवा देणी इत्यादीचा भरणा करावा लागेल.

१२. कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर ई-लिलावातील कोणतीही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव रद्दबातल करणे / पुढे ढकलणे / रद्द करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मालमत्ता मागे घेणे याचा संपूर्ण अधिकार प्राधिकृत अधिकारी / बँकेकडे असेल. उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांचा तपशील प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार असून यामधील कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा त्रुटी यास;अ प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.

१३. विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदाराच्या / अर्जदाराच्या नावे जारी करण्यात येईल ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.

१४. दि सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स अॅन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम / अटींच्याआधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती / चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंधित शाखांच्या उपरोक्त देण्यात आलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधून प्राप्त करता येईल.

१५. एकदा केलेली बोली मागे घेतली जाणार नाही किंवा रद्द केली जाणार नाही. वापरकर्त्यांच्या नोंदणीकृत आयडीवरून केलेल्या सर्व बिड केवळ त्यांने/तिने केल्या आहेत असे मानले जाईल.

१६. ही सूचना कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला देखील लागू आहे.

### कर्जदार/जामीनदार यांना विक्री सूचना

**ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स १००२, च्या नियम ८(२) अंतर्गत कर्जदार आणि जामीनदारांना (एस/ आर. एस.) द्वारे स्थावर सूचना स्थानांतरण देण्यात आलेली ३० दिवसांची सांविधानिक विक्री सूचना म्हणून समजण्यात यावी.**

माननीय महोदय/महोदया,

निम्नस्वाक्षरीकार हे बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार त्यांना ही विक्रीची सूचना जारी करण्याचे आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे बँकेद्वारे देण्यात आलेल्या कर्जाच्या संदर्भात थकीत देणी आणि त्यावरील मासिक दंड, शुल्क आणि भार यांचे भरणा करण्यास असमर्थ ठरले आहात म्हणून बँकेने तुमच्यावर उपरोक्त नमूद रकमेचा भरणा ६० दिवसांमध्ये करण्यासाठी कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आली होती. तुम्ही ६० दिवसांच्या मुदतीनंतरही रकमेचा भरणा करू शकला नाहीत म्हणून प्राधिकृत अधिकाऱ्यांना कलम १३(४) च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी उपरोक्त परिशिष्ट पथ्ये देण्यात आलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हास सूचना देण्यात येते कि, विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या पूर्वी उपरोक्त नमूद केलेल्या रकमेचा भरणा करावा आणि जर असे न झाल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि जर काही शिल्लक असल्यास तुमच्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल.

कृपया नोंद घेण्यात यावी कि, मागणी सूचना, ताबा घेणे, मालमत्तेचे मूल्यांकन आणि विक्री याबाबी झालेला सर्व खर्च प्राधिकृत अधिकाऱ्याकडून कळवण्यात येईल आणि प्रथम तो वजा करण्यात येईल आणि विक्री प्रक्रियेतील उर्वरित पीक्य भाग उपरोक्त नमूद तुमच्या लागू असणाऱ्या देण्यांसाठी वापरण्यात येईल. अटी आणि शर्ती यावर आधारित असलेल्या लिलावामध्ये तुम्ही आवश्यक त्या बयाणा (ई.एम.डी.) रकमेचा भरणा करून सहभागी होऊ शकता.

स्थळ : रत्नागिरी
दिनांक : ०६.०३.२०२४

सही/-
प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ इंडिया